महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 21/07/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर बोर्डा गणेशी कन्हान येथे दि. 19/07/2021 चे 18.00 वा. ते दि. 20/07/2021 चे 07.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– मुन्नालाल परसराम अमृते, वय 53 वर्ष, रा हनुमान नगर, कन्हान यांनी त्यांचे ट्रैक्टर घरासमोर रोडवर लावुन रात्री घरातील सर्व मंडळी झोपुन गेले. सकाळी फिर्यादीचा मुलगा हा ट्रैक्टर क्याचविल लावत असतांना ट्रैक्टरमध्ये बॅटरी दिसुन आली नाही. गावात बातमी पसरताच श्री बेलीराम तेजराम डुडरे यांनी सुदधा त्यांचे ट्रैकटर मध्ये बॅटरीची पाहनी केली असता त्यांना सुदधा बॅटरी दिसुन आली नाही अशा दोन बॅटरी एकुन कि. 8,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा वरखडे पोस्टे कन्हान मो. क्र. 9637005303 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावरील मौजा बुटीबोरी येथे दि. 10/07/2021 चे 11.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– अरविंद गोवींद गोतमारे, वय 52 वर्ष, रा. गोदावरी नगर वार्ड क्र. 1 बुटीबोरी, ता. जि नागपुर हे बॅक ऑफ इंडीया चे एटीएम मध्ये पैसे काढण्याकरीता गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे एटीएम ची हातचालाखीने अदलाबदली करून फिर्यादीच्या एटीएम दवारे फिर्यादीच्या खात्यातुन कि. 30,000/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक कापसे पो.स्टे बोरी 8888864967 हे करीत आहे.

3) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 500 मी. अंतरावर भारती स्टेट बॅक सावनेर चे समोर येथे दि. 20/07/2021 चे 02. 40 वा. ते 20.45 वा. सुमारास फिर्यादी नामे– रजत रामराव रहाटे, वय 23 वर्ष, रा. मंगसाता, सावनेर याच्या मोटारसायकलच्या हॅडलला अडवलेली नगदी 2,70,000/–रू. रककम असलेली बॅग अज्ञात आरोपीने नजर चुकवुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथ आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सागर कारंडे पो स्टे सावनेर मो.नं. 7722011228 हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत तेलकामठी अंतरावरील येथे दिनांक 19/07/2021 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– उमाकांत पंढरी मोहोड, वय 55 वर्ष, रा. वार्ड क्र. 2 तेलकामठी यांचे शेतात काम करणारा रोशन पुरूषोत्तम खडसे वय 30 वर्ष याने आरोपी क्र. 1) सुरेश संजय खडसे याला "भाटव्याचे कामाचे पैसे का मागतो" असे म्हटले याकारणावरून आरोपी क्र. 1) सुरेश संजय खडसे, 2) गोलु संजय खडसे दोन्ही रा. तेलकामठी ता कळमेश्वर व सुरेश संजय खडसे यांचे दोन साळे रा. कन्हान कामठी खैरी यांनी संगणमत करून झगडा भांडण केले. तसेच आरोपी क्र. 1 याने काठीने रोशन खडसे याचे डाव्या पायाला, उजव्या हातावर मारून जखमी करून फ्रॅक्चर केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 506, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ देवशंकर गुप्ता मो.नं. 9511247261 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 कि. मी अंतरावरील मौजा चिचोली खापरखेडा येथे दिनांक 19/07/2021 चे 06.00 वा. दरम्यान आरोपी क्र 01) राष्ट्रपाल शेंडे याने फिर्यादी नामे– अभिलाष राम राउत, वय 24 वर्ष, रा. वार्ड क्र 01 चिचोली यास म्हटले की, "तुझे मजुरी चे पैसे देतो ग्राम पंचायत चिचोली येथे येउन भेट" असे सांगितले. यावरून फिर्यादी हा भेटायला गेला असता आरोपी क्र 01 व त्याचा मित्र आरोपी क्र. 02 यांनी फिर्यादी सह झगडा भांडण करून आरोपी क्र 01 याचे ताब्यातील पाढ–या रंगाचा स्विफट मधून लाकडी दांडा व लोहाची रॉड काढुन आपसी संगनमत करून फिर्यादीस पकडुन हातबुक्याने तसेच लाकडी दांडयाने मारहाण केल्याने फिर्यादीचा उजव्या हाताचा कोनीला जबर मार लागुन फॅक्चर झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 325 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुरेन्द्र वासनिक पो स्टे खापरखेडा मो. नं. 9823196821 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 14 कि. मी अंतरावरील मरारवाडी शिवार रामटेक दिनांक 19/07/2021 चे 19:00 वा. ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादीचे भाउ नामे– अरविंद दामाजी वाघाडे, वय 39 वर्ष, रा. दुधाळा, कवडक ता. रामटेक हा आपले त्याच्या एम.एच. 40/ जे. 3326 क्रमांकाच्या पॅशन प्लस माटरसायकलने देवलापार कडुन गावाकडे जात होते. त्यादरम्यान त्यांनी आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून अनियत्रींत होवुन रोडच्या बाजुला सेल क्रॉस बेरीयर ला धडक मारून जख्मी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत ठरले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिल दामाजी वाघाडे, वय 42 वर्ष, रा. दुधाळा, कवडक ता. रामटेक चे भाऊ नामे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री बोरकर 9552535825 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर